# जाहीर नोटीस

तमाम लोकांना, बँकेला तसेच संस्थाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, नंदुरबार जिल्हयातील ता. शहादा येथील मोजे तोरखेडा ता. शहादा जि. नंदुरबार येथील यासोबत अनुसुचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमिन धारकांच्या जमिनी मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचा नावे जलसंपदा विभागाचे प्राधिकृत प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग धुळे व उपविभागीय अधिकारी, सारंगखेडा प्रकल्प उपविभाग दोंडाईचा उपविभाग यांचे अंतर्गत सारंगखेडा बॅरेजच्या बुडीत क्षेत्रासाठीचा प्रस्ताव तोरखेडा ता.शहादा योजनेच्या वितरिकासाठी आवश्यक जमिनी महसुल व वनविभाग, यांचे कडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-03/2015/प्र.क्र.34/अ-2 मंत्रालय, मुबंई दिनांक 12 मे 2015 (शासन निर्णय सुधारणा दि.30 सप्टेबर 2015 व शुध्दीपत्रक दिनांक 21 सप्टेबर 2016) व महसुल व वन विभागाचे शासन परिपत्रक क्र.एलक्युएन-01/2017/प्र.क्र.12/अ-2 मंत्रालय, मुबंई दिनांक 25 जानेवारी 2017 नुसार मा.जिल्हास्तरीय समितीने मंजुर केलेल्या दरा नुसार खाजगी जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीने सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन/खरेदी करण्याचे प्रस्तावीत आहे.

यासोबत अनुसुचिमध्ये संबधीत जमिन मालकाचे नाव, गट नंबर व थेट खरेदीने संपादन करावयाचे क्षेत्र इ. तपशिल दिला आहे. सदर जमिनीबाबत जमिन मालकांच्या हिश्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबधी, दत्तक पुत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लीज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, करारदार, या इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन 10 दिवसाच्या आंत लेखी स्वरुपात सबळ पुराव्यानिशी कार्यालयीन वेळेत (सकाळी 11.00 ते सांय 5.00 पर्यत) भुसंपादन अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा या कार्यालयात समक्ष अथवा रजिष्टर पोस्टाने इकडील कार्यालयास कळवावे. तसेच नमुद केलेल्या पत्यावर सर्व कागदपत्रासह समक्ष येवुन भेटावे व आपले असलेले हित संबधात लेखी खात्री करुन दयावी. तसे न केल्यास कुणाचेही काही एक म्हणणे अगर हरकत नाही. असे समजुन सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यांनतर येणा-या हरकती आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहु जमिन मालकीची मिळकत निर्बंध व निजोखमी असल्याचे समजुन इकडील कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन, यांचे वतीने मुदतीनंतर केव्हाही खरेदीचा व्यवहार पुर्ण करेल, दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, ही खरेदीपुर्व नोटीस असे.

ठिकाण- शहादा

दिनांक 09/04/2018

उपविभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा

Scanned with CamScanner

# - अनुसुची -
-

(सारंगखेडा बॅरेजच्या बुडीत क्षेत्र एसआर क्रमांक 21/2006 तोरखेडा ता शहादा जि नंदुरबार)

तालुका- शहादा गाव मौजे तोरखेडा ता शहादा जि नंदुरबार

| अ.क्र. | जमिन मालकांचे नाव | शिवार | गट / सर्व्हे क्र. | एकुण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लागवडीलायक | पो ख |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | झिपा एका बैसाणे | तापी नदीकाठालगत तोरखेडा शिवार | 474/2 | 1.34 | 0.16 | 0.00 |
| 2 | लोटन चिंधा थोरात | तापी नदीकाठालगत तोरखेडा शिवार | 475/2 | 2.03 | 0.30 | 0.00 |
| | एकुण | | | 3.37 | 0.46 | 0.00 |

ठिकाण :- शहादा
दिनांक :- 09/04/2018

(लक्ष्मीकांत साताळकर)
उपविभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा

Scanned with CamScanner